जा. क्र./नांवाशमनपा/नरवि/ 840
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
दिनांक 10/3/15

# परिपत्रक

**विषय : हार्डशिप प्रिमीयम आकारणीबाबत.**

**संदर्भ : 1) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 143.**
**2) विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.32(2).**
**3) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड सर्व साधारण सभा ठराव क्र. 37 दि. 19.07.14**
**4) कार्यालयीन परिपत्रक क्र. नरवि/8091 दि. 24.07.2014**

उपरोक्त विषयी वरील संदर्भाच्या अनुषंगाने संदर्भ क्र. 3 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्व साधारण सभा ठराव क्र. 37 दि. 19.07.2014 अन्वये महानगरपालिका हद्दीतील अनाधिकृत बांधकामे सामासिक अंतरे व चटई क्षेत्र निर्देशांकामध्ये प्रिमियम आकारुन सुट देवून हार्डशिप अंतर्गत नियमित करणेबाबत ठराव पारीत झालेला आहे.

तथापि, दरम्यानच्या कालावधीमध्ये असे निदर्शनास येत आहे की, नागरीक इमारत बांधकाम परवानगी घेतल्यानंतर मंजूर बांधकाम नकाशाप्रमाणे बांधकाम करत नाहीत. व बांधकाम झालेनंतर पुनश्च प्रस्ताव प्रिमियम अंतर्गत सादर करतात. व इमारतीस सामासिक अंतरात सुट घेवून नियमित करुन घेत आहेत. त्यामूळे मंजूर नकाशाविरुध्द च्या अनाधिकृत बांधकामास आळा न बसता बांधकाम केलेनंतर देखील मंजूर नकाशाविरुध्द झालेले बांधकाम नियमित होत असल्याचे जनसामान्यात प्रतिमा होत असून त्यामूळे सद्यस्थितीत बरीच अनाधिकृत बांधकामे होत आहेत असे दिसून आलेले आहे.

त्यामूळे संदर्भ क्र. 3 अन्वयेच्या ठरावानूसार विद्यमान अनाधिकृत बांधकामे प्रिमियम आकारून नियमित करणे चा मूळ उद्देश सफल होत नाही. म्हणूण सदर बाब ही शहराच्या नियोजनबध्द विकासाच्या अनुषंगाने व आपत्कालिन काळात सार्वजनिक सेवा सुविधा (जसे अग्निशमन सेवा, आरोग्य सेवा इ.) पुरविण्याच्या दृष्टीने अडचण निर्माण होऊ नये याचा विचार करता सदरील परिपत्रकात खालील प्रमाणे अंशतः बदल करण्यात येत आहेत. सदरील आदेश या आदेशाच्या दिनांकानंतर देण्यात येणा-या बांधकाम परवानगी प्रकरणास लागू राहील.

| अ. क्र. | प्लॉट चे क्षेत्र | पुढील बाजू | | बाजू 1 | बाजू 2 | मागील बाजू |
|---|---|---|---|---|---|---|
| | | रहिवास वापर | वाणिज्य वापर | | | |
| 1 | 125 चौ. मी. | 50 % | 0 | 50 % | 50% | 50% |
| | किंवा | 50 % | 0 | 100 % | 0 | 50 % |
| | किंवा | 0 | 0 | 50 % | 50 % | 100 % |
| 2 | 125 ते 150 चौ. मी. | 50 % | 0 | 50 % | 50 % | 50 % |
| 3 | 150 ते 250 चौ. मी. (up to two tenements) | 30 % | 0 | 50 % | 50 % | 50 % |
| | 150 ते 250 चौ. मी. (more than 2 & maximum 4 tenements) | 0 | 0 | 30 % | 50 % | 50 % |
| 4 | 250 ते 500 | 0 | 0 | 30 % | 40 % | 50 % |
| 5 | 500 पेक्षा अधिक क्षेत्र | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

टिपः 1) वाणिज्य वापरासाठी पुढील बाजूच्या सामासिक अंतरामध्ये शिथिलता देण्यात येणार नाही.
2) नियमित आकारमान नसलेले प्लॉटस साठी प्रकरणानिहाय मंजूर सुधारीत विकास नियंत्रण नियमावली मधील नियम क्र. 32 (2) प्रमाणे आयुक्तांचे अधिकार राहतील.

(स्वाक्षरी) 10/03/15
आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**प्रत माहितीस्तवः**

1) अप्पर आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपानलका, नांदेड
2) उप आयुक्त (महसूल), नांदेड वाघाळा शहर महानगरपानलका, नांदेड
3) उप आयुक्त (विकास), नांदेड वाघाळा शहर महानगरपानलका, नांदेड
4) उप आयुक्त (प्रशासन), नांदेड वाघाळा शहर महानगरपानलका, नांदेड
5) सर्व तांत्रिक कर्मचारी, नगर रचना विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपानलका, नांदेड
6) जनसंपर्क अधिकारी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना प्रसिध्दी देणे बाबतच्या कार्यवाहीसाठी